प्रकरण ४ थे

नामेदवांच्या ज्ञानेश्वर चरित्राचे विशेष

पृष्ठ कमांक ०९७ - १३०

# नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राचे विशेष

संतश्रेष्ठ नामदेवांनी आपल्या अभंगरचनेमधून भक्ति, ज्ञान, आत्मचरित्र आणि ज्ञानेश्वर चरित्राचे वर्णन आंपल्या सहजोद्‌गारांतून प्रकट केलेले आहे. नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र अभ्यासताना या चरित्रांचे अनेकविध पैलू व वैशिष्ठये दिसून आली.

**● पंक्तीतील आद्य चरित्र:-**

ज्ञानेश्वरांच्या इतर चरित्रांपैकी ज्ञानेश्वरांचे नामदेवांनी हे लिहीलेले पहिले पद्य पंक्तीतील आद्य चरित्र होय. इतर चरित्रे ही गदयामधून आहेत. परंतु नामदेवांच्या अभंगातून काव्यातून सहजस्फूर्त, ओघवत्या, रसाळ वाणीने चीरकाळ जीवंत ठरलेले हे काव्यात्मक चरित्र मराठी वाड्:मयात आपला वेगळाच ठसा उमटवून राहिले आहे.

**● प्रत्यक्ष अनुभवातून लिहीलेले चरित्र:-**

नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन, मित्रत्वाचे नाते असलेले त्यामुळे नामदेवांच्या बरोबर फिरलेले हिंडलेले होते. त्यांच्या सहवासात त्यांनी बरेच दिवस घालवले होते. त्यांच्याशी अध्यात्मिक चर्चा करुन, तिर्थयात्राकरुन त्यांनी ज्ञानेश्वरांना प्रत्यक्ष अनुभवले होते. म्हणजे सांगोवांगी किंवा, वाचनामधून, संशोधनामधून संदर्भामधून माहिती गोळा करुन त्यांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहीलेले नसून स्वानुभावातून त्यांना जसे जसे ज्ञानेश्वर भोवले, अनुभवले तसे त्यांनी साकार केले.

थोडक्यात, स्वानुभूतीतून साकारलेली ज्ञानेश्वरांची मूर्तीच जणू त्यांनी आपल्या अभंगातून कोरली आहे.

**● आदरभावनेतून व्यक्त झालेली कृतज्ञता:-**

नामदेवांना ज्ञानेश्वरांबद्‌दल अत्यंत आदरभाव होत. त्यांना त्यांच्याबद्‌दल आत्किकता होती. त्याचबरोबर ज्ञानेश्वर नामदेवांच्या पेक्षा वयाने लहान असले तरी ज्ञानाने, मानाने मोठे होते हे नामदेवांनी अभंगांमधून व्यक्त केले आहे. त्यांनी ज्ञानेश्वरांकडून जे अध्यात्मिक ज्ञान अनुभवले. जे ब्रह्मानंदाचे सुख घेतले

त्यामधून उतराई व्हावे असेही नामदेवांना वाटत असावे आणि म्हणूनच त्यांनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, आदरभावनेने हे चरित्र लिहिले.

- **हृदयाच्या कळवल्यातून निघालेले उमाळे:-**

मनःचक्षुला ज्ञानेश्वरांचे-अंतःकरणापासूनचे, हृदयामधले उमटलेले प्रतिबिंबच जणूकाही नामदेवांनी अभंगातून साकार केले आहे.

- **भक्तिभावनेतून प्रतित झालेली भक्तिसाधना :-**

नामदेवाना पांडुरंगाबद्दल जेवढा भक्तिभाव होता. तेवढाच आणि तसाच भक्तिभाव, ज्ञानेश्वरांबद्दल होता. ज्ञानेश्वरांची भक्तिसेवा करावी, त्यांच्याबद्दलचा भक्तिभाव प्रकट करावा अशी भावना नामदेवांची होती आणि म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरांची अभंगरचनेतून भक्तिसाधना केली.

- **साक्षात्कार घडविण्याचे सामर्थ्य:-**

नामदेवांच्या वाणीचे, भाषेचे एवढे जबरदस्त महत्व आहे की त्यांचा अभंगाचा अभ्यास करताना, समाधी प्रसंग अनुभविताना वाचकांना ज्ञानेश्वर चरित्राचा साक्षात्कार घडवून आणण्याचे सामर्थ्य इतर कोणत्याही चरित्रात नाही. वाचकांना, अभ्यासकांनाही नामदेवांच्या वाणीने समग्र ज्ञानेश्वर चरित्र अनुभवण्याचा साक्षात्कार त्यांच्या शब्द सामर्थ्यात आहे.

# नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्रांचे विशेष

## "नामदेवांचे कवित्व"

नामदेवादि संतांचे काव्य पत्सत्वस्पृष्ट आहे. आपल्या आध्यात्मिक 'वस्तू'शी संतजन एकरुप झाले आणि समरस्यातील सौंदर्य व्यक्त करण्याचे काव्य हे सुलभ सोपे साधन आहे. एकवळयाच दृष्टीने त्यांनी काव्यरचना केली. किर्तनांच्या रंगात नाचून जगी ज्ञानदीप लावण्याची प्रतिज्ञा करणारे संत नामदेव अभंग लिहतात ते परमार्थ प्रीतीनेच संतांचे काव्य हे त्यांच्या आधात्मिक अनुभूतीचा अपूर्व अविष्कार आहे.

खरे म्हणजे सामाजिक किंवा वाड्:मयीन प्रयोजनांनी उद्युक्त होऊन संतांनी काव्य केले नसून पारमार्थिक उद्यिष्ठांनी प्रीत होऊन परतत्वाचा स्पर्श झालेले आपले जीवन त्यांनी काव्यात प्रतिबिंबीत केले. ब्रह्मास्वादसहोदर असलेला काव्यानंद लुटण्यासाठी त्यांनी पद्यरचना केली नसून प्रत्यक्ष ब्रह्मास्वादाच्याच अलौकिक आनंदाने हरवून जाऊन त्यांनी आविष्कार केला.

नामदेवांनी आपल्या अभंगरचनेत स्वतःच्या अध्यात्मिक जीवनाचा आलेख काढला आहे. उकृष्ठ भाव्यकाव्याला आवश्यक असलेले उत्कटता, रसंवत्ता प्रसाद इत्यादी गुण त्यांच्या अभंगात सहज आलेले असल्यामुळे त्यांची आत्मपर रचना अभिजात काव्याच्या कसोटीस उतरले.

## कवित्वांचे कारण:-

कविची प्रतिभा, प्रतिमेस साहाय्यदेणारी कवीची व्युत्पन्नता आणि त्यांचे परिश्रम ही तीन काव्य कारणे साहित्यशास्त्रकारानी सांगितलेली आहेत. त्याचबरोबर उत्कट भावनात्मकांचा हा आणखी एक गुण काव्योत्पत्तीस आवश्यक आहे. त्यांना अनुलक्षण नामदेवांच्या अभंगेवाणीचा विचार करु.

## प्रतिभा:-

ही अभिजात अशी देणगी आहे ती प्रयत्न साध्य गोष्ट नव्हे. कवी हे जन्मजातच असतात ते तयार करता येत नाहीत. असे दंडी यांनी म्हटले आहे. कवित्वाची देणगी देवदत्त असते हे संतकर्तीनाही अभिप्रेत आहे.

"नामा म्हणे हरि बोलिलो तुझिया बळे

सारजेंसी सांगे भीमातीरी हरी । बैस जिव्हेवरी नामयाच्या [१]

प्रतिभा ही नवनवीन उन्मेष धारण करणारी मानसिक शक्ती आहे. नामदेवांच्या मनःशक्तीचे असे नवोन्मेष अनेक स्थळी आढळून येतात.

जुनेच विषय नवकल्पनांनी मंडित करुन मांडणे हे प्रतिभेचे प्रतिमेचे वैशिष्ठय होय. 'नरदेह नश्वर आहे' ही जुनीच कल्पना "शरीर काळाचे भातुके" या समर्पक रुपकांतून ते व्यक्त करतात किंवा दररोज आपले आयुष्य कमीकमी होत असते हा विचार 'अनुचेनि मापे आयुष्य जे चळे' या अन्वर्षक कल्पनेतून ते मांडतात. ज्ञानेश्वरांची आदी, तीर्थावळी व समाधि अशा विविध कथाभागातून नामदेवांच्या प्रतिभाविलासाची अपुर्वाही जाणवते. याच दृष्टीने ज्ञानदेवांच्या लेखणीतून उतरलेली पुढील सुभाषीते लक्षणीय आहेत.

वैकुठांसी शिडी लावियेली (अ.१०५७)

अंकुरला गाभा विराटाचा (अ.११८४)

ज्ञानदीप लावू जगि (अ.१३९२)

या अर्थबहुल, सरस व रमणीय काव्यपंक्तीमधून नामदेवांच्या प्रातिभीक शलाका प्रभाविकपणे दिसून येतात. त्यांच्या कल्पना शक्तीची स्वतंत्रता व अपुर्वता त्यातून विशेष जाणवते.

<u>व्युत्पन्नता :-</u>

व्युत्पन्नतेविषयी नामदेवांनी दुहेरी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. याविषयीच्या आपल्या मर्यादा ते मोकळेपणाने एकदमच मान्य करतात. त्यातही त्यांच्या विनयाचा भागच अधिक आहे. अभंगरचनेत त्यांनी कमीत कमी संव्वीस तरी पैराणिक कथांचे निर्देश केले आहेत. ते त्यांच्या बहुश्रृततेचे द्योतक ठरतील.

नव्हे बहुश्रुत नव्ह ज्ञानशील । दासमी दुर्बळ वैष्णवांचा (अ.९२४)

कलावंतांच्या कलाकुसरी । त्या मी नेणे गा श्रीहरी ॥(अ.२०५४)

येथे जाणिव-शहाणीव आणि व्युत्पत्तीची योग्यता पाहून नये असा ईशारा त्यांनी तिर्थावळीच्या या प्रकारणाच्या उपसंहारात दिला आहे. (अ.९७०) मनातील

भक्तीभावा अभावी वैदिक, कर्मठ, गुणीजन, याज्ञीक, वैष्णव होणार नाही. भक्तीभावाची सरलता पांडित्याने बिघडले असे त्यांचे मत होते. नामदेवांची काव्यरचना एक अभंग वृत्तातच केलेली असली आणि कांही स्थळी ही कविता आर्ष व सैल असली तरी ती अंत:करण हालवून सोडणारी व सदैव आनंद देऊ शकणारी अशी आहे. नामदेवास पुस्तकी पांडीत्याचा संपर्क झाला नव्हता त्यामुळे त्यांच्या काव्यात तांत्रिक बारकावा किंवा तर्ककर्कशता नाही.

**परिश्रम :-**

नामदेवांच्या कवित्वांत फारशे संस्करण नाही कलेत अभिजानतेच्या खालोखाल संस्काराला महत्व असते. नामदेवाच्या मुखातून भावानावेगामुळे जे उद्‌गार बाहेर पडले त्यांनाच त्यांनी काव्यरुप दिले.

**भावनात्मकता :-**

नामदेवांच्या दृष्टीने अधिक महत्वाचे कारण म्हणजे त्यांची उत्कट भावनात्मकता. प्रतिमेलाही काव्यस्वरुप पावण्यास भावसमाधीची जरुरी असते.

हासे, नाचे प्रेमें फुंदतु, डुल्लतु । अहर्निशीं गातु नाम तुझे (अ.१२८२)

प्रेम पिसे भरले अंगी । गीत संगे नांचो रंगी (अ.१५१९)

या उल्लेखावरुन नामदेवांचे काव्य भावनांकित व भावत्कट होते असे लक्षात येते. नामदेवांजवळ विशिष्ठय काव्यदृष्टी नव्हती. काव्यविषयांची त्यांची आत्मविस्मृती असाधारण होती. हे नेणीवेतील काव्य आहे. नामदेव म्हणतात -

कोणवेळ काय जाणे । हे तों भगवंता मी नेणे

वारा वाजें भलतया । तैसी माझी रंग छाया

टाळमृदुंग दक्षिणकडे । माझे गांणे पश्चिमेकडे

**काव्यनिर्मितीचा हेतू:-**

यश, अर्थप्राप्ती, किर्ती इत्यादी लैकिक प्रयोजने नामदेवांदी संताच्या काव्यात संभवलच नाही उदात्त आनंद रोचक उपदेश व अशुभनिवारण हे हेतु मात्र त्यांच्या अभंगरचनेमागे आहेत.

आनंदः-

नामदेवांना सगुणोपासनेचा छंद लागला होता. विटेवरचे ते सावळे परब्रह्म भेटल्यामुळे झालेला अपूर्व आनंद त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे.

सुखांचे हे सुख श्री हरि मुख । पाहतांही भूक तहान गेली (अ.९५२)

सुखाचा सोहळा वाटतसे जीवा । भेटणे केशवा लागी आजी (अ.६६९)

माझे सुख मज दाखविले डोळा । दिधली प्रेमकळा नाममुद्रा (अ.१४०१)

उपदेश :-

भक्तीस्तोम माजविणा-या वेशधा-यास उपदेश, खलदुर्जनांस उपदेश, ममुक्षुंस उपदेश,मनास,जनास उपदेश इ. गाथेतील प्रकरणातून उपदेशपर विचार दर्शन घडते.

अशुभनिवारण :-

नाममहिमा व संतमहिमा गाताना आणि शिवराम महात्म्य सांगताना नामदेवांनी त्यापासून होणारे अशुभाचे निवारणही वर्णीले आहे. त्यामुळे प्रपंचाचे बिरडे तुटेल (अ.६२०) चंद्रभागेत स्नान केल्याने यमलोकापासून सुटका होईल (अ. ४२१) हरीनामाचा छंद लागल्याने मायाजाळ तुटेल (अ.८०९) असे अनेक उल्लेख त्यांच्या अभंगात आढळतात.

मुख्यहेतुः-

नामदेवांच्या कवित्वाचा मुख्यहेतु, खरा हेतु उद्देश विठ्ठलाला वश करण्याचा आहे. म्हणूनच

'बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले'[२]

हरिनामाचा महिमा गावा, भक्ती वाढावी आणि हरिदासांना अकल्प आयुष्य व संत मंडळीस सुख चिंतावे यापेक्षा वेगळा हेतू मनात ठेवून नामदेवांची ग्रंथरचना केली नाही. नामदेवांच्या अभंगाचा रोख निव्वळ तत्वज्ञान सांगण्यापेक्षा भक्ती वाढविण्याकडे जास्त आहे. भक्ती नुसत्या ध्येयाच्या तत्वीक स्वरुपाशी रमत नाही, तीला देहांचे व्यवहारांतील परिणाम अधिक प्रसन्नता आणतात भक्तीभावाच्या अविष्कारासाठीच "वाकडे तिकडे जैसे आले तैसे । गावया उत्साह उगवला" असे नामदेवांनी म्हटले आहे.

## काव्याचे स्वरुपः-

**अभंगांचे अंतरंगः-**

नामदेवांचे किर्तन हे त्यांचे प्रकट चिंतन आहे मनास उपदेश, आत्मसुख प्राप्तीविषयी आर्तोग्दार इत्यादी प्रकरणातून त्यांचीही चिंतनशीलता प्रकर्षाने प्रत्ययास येते. -

क्षण एक मना बैसोनि एकांति । विचारी विश्रांती कोठे आहे
दुर्लभ आयुष्य मनुष्य देहिचे । जातचे मोलाचे वायाविण
खापराचे साठी सांडिला परिस । गहिवरे फुटतसे ह्रदय माझे
(मनाचा उपदेश, अ.२०६५)

तुझा माझा देव कारे वैराकार । दुखांचे डोगर दाखविसी
बळे बांधानिया देसी काळा हातीं । ऐसे काय चित्तीं आले तुझ्या
नामा म्हणे देवा करा माझी किव । नाहीतरी जीव घ्यावा माझा
(आत्मसुख प्राप्तीविषयी, आर्तोग्दार अ.१६२७)

नामदेवांच्या कवित्वाची ही रित 'आपुला संवाद आपणासी' या प्रमाणे आहे. त्यांच्या काव्यातील खंडणपर किंवा निषेधपर भागही प्रेमरसात भिजवून काढल्याप्रमाणे बराच सौम्य व मृदू आहे. त्यांमुळेच त्यांची खलदुर्जनास किंवा भक्तीस्तोम माजविणा-या वेषधा-यास उपदेश करतानाही त्यांच्या वाणी तुकाराम इतकी परखड बनत नाहीत.

नामदेवांच्या वाणीत भावना आणि कल्पना अव्याज मनोहर मिश्रण आहे.

मल्हार माहुडे गगनी दाटले । विजुखळे गर्जिन्नले गे माय
गोविंद पहाया लोकरी । कैसे वरुषताहे मधुधारी गे माय
आनंदे मयुरे नाचती आपैसें । प्रेमे निलकंठ झाले ते कैसे (अ.२५१)

या अभंगातील उत्कट ऐंद्रिय अनुभव, रंगाची, सुसंगती आणि भाववृत्तीची समरसता याचे साहचर्य विलोभनीय आहे. विशेषत: 'प्रेमे निलकंठ' हा शब्दप्रयोग फार बोलका आहे. विशप्राशन करावे न लागतां उत्कट प्रेमबळावर निळकंठ पदवी प्राप्त होणे विलक्षण अर्थघन आहे.

नामदेवांनी आपले समग्र कवित्व विठ्ठलाविषयीच्या प्रेमभक्तीने केले आहे. विठ्ठलाला वश करणारे काव्य तेच खरे काव्य असे त्यांचे श्रेष्ठ मुल्य आहे. इतर सगुणपासकांत प्रमाणे ईश्वर प्राप्ती हे त्यांच्या भक्तीचे अंतीम मुल्य नसून ईश्वर प्रीती हे त्यांचे खरे इप्सित आहे.

विषय निरुपणासाठी नामदेवास व्यवहारीक दृष्यात चटकन सुचतात. अधमाने तिर्थाटन केले तरी त्यांचे मन निर्मळ होत नाही हे सांगण्यासाठी "कडुरुदांवन साखरे घोडीले । तरी काय गेले कडुपण" असे उदाहरण ते सहजपणे देतात. शोकांचा पुतळा (२०६५) संशयाचे कोंथ (१०५७) गितार्थाचा सोहळा (१०९०) सुखाचा सुरतरु (९४१) मायेचे घरकुल (५२१) अहंकाराचा वारा (८८३) चंद्रबिंबाची कुरवंडी (५३९) अशा अनेक सुंदर कल्पना जाता जाता मांडतात. पुनरुक्ती आणि विरोध यांनी एकच कल्पना मनात ठसविण्याची त्यांची पध्दती परिणामकारक आहे.

मुषक धान्यानें चालुनि भुमीतें । मांजर तयाने टपतसे
तैसा तुजकाळ टपे वेळावेळा ॥ (अभंग १९३७)

हे सारे सौंदर्य नामदेवांनी आपल्या काव्यात जाणिवपूर्वक आणलेले नाही. हे सहजतेतील सौंदर्य आहे. म्हणूनच 'त्यांची भरे तोंडाआले ते बोलतो' हे त्यांचे म्हणणे विनयशीलतेपेक्षांही वस्तुस्थिती निदर्शकच आहे.

<u>रसविचार :-</u>

नामदेवांची अभंगरचना रससिंध आहे त्यांच्या समकालिन संतमंडळीनाही, त्यांचे काव्य रसात्मक असल्याची ग्वाही दिली आहे. -

परि नामयाचे बोलणे नव्हे रे कवित्व । हा रस अद्‌भुत निरुपम
(ज्ञानेश्वर अ.९२७)

दुधावरी साय ते मी वाणूं काय । तैसे गाडे गाय नामदेव
(परिसा भागवत अ.९)

तैसे रसाळ अमृत नामयाचे गीत । (परिसा भागवत अ.१०)

# नामदेव गाथेतील विविध रसांचा अविष्कार

**भक्ती:-**

नामदेवांच्या कवित्वांचा भक्तीरस हा प्रामुख्याने दिसून येतो. रुपगोस्वामी आणि मधुसुदनसरस्वती यांनी भक्तीरसाळ रसमालिंकेत केवळ स्थानच नव्हेतर प्राध्यान्य दिले. काव्यांत भक्तीभावना उत्कटपणे व्यक्त होऊ शकते आणि वाचकाला ती अस्वाद देऊ शकते. शरणागती ही मुलभूत प्रवृत्ती भक्तीला आधार होऊ शकते तिचा प्रबळ भावबंध होऊ शकतो. अष्ठसात्वीक भावनांना ही त्यामध्ये स्थान आहे.

नामदेवांची अभंगवाणी म्हणजे भक्तीरसाची मंदाकिनी आहे "मनुष्य करिसी भक्तीचेनी मिषें । तुझे दारीं वसे ऐसे करी"(अ.१७३४) एवढेच त्यांचे मागणे आहे. नामदेवांच्या प्रेमळपणांत याचकाची आर्तता लेकराचा लडिवाळपणा आणि जातकाची अनन्यता आहे. त्यांच्या अभंगरचनेतील अनेक स्थळी भक्तीरस आणि वत्सलरस एकमेकांत मिसळून गेले आहेत.

'पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे'। किंवा 'विठायी माऊली कृपेची कोवळी'।(अ. १५०७) अशी अनेक उदाहरणे त्यांच्या काव्यात आढळतात.

भक्तीत्वावरील अनन्यनिष्ठा हा नामदेवांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या कवीत्वाचाही एकमेव विषय आहे. भक्तीरसाच्या संदर्भात स्वेद, स्थंभ, कंप, रोमांच, स्वरभेद, वैवर्ण्य, आश्रु आणि प्रलय या अष्ठसात्विक भावांचा र्निर्देश केला जातो. या भावांनी भावनेचे सामर्थ विशेषत्वाने व्यक्त होते. कीर्तनसमयी प्रत्यक्ष अभंग गायन करताना त्याचा अविष्कार होणे सहाजिकच आहे. पण आपल्या काव्यरचनेंतही त्यातील काही भावांच्या अनुभुतीचा निर्देश नामदेवांनी केला आहे हे विशेष होय.

पुलकधर्म रोमांचनाही जंवे उठले । सजलनाही झाले नयन जंव
हरिभक्तीचे सुख कळले जे म्हणती । टिकें बोलिजे ती उभयलोकि
(अ.१७२६)

आत्मसुखप्राप्तीविषयी आर्तोग्दार या प्रकरणात नामदेवांनी श्रवण कीर्तन

अर्चनादि नवविद्या भक्तींच्या निरुपणासाठी अभंग १४२१ ते अभंग १६२४ असे दोनशेहून अधिक अभंग वेचले आहेत. त्यातील भक्तीभावनेची आर्तता करुणरम्य आहे.

अमृताहूनी गोड नामतुझे देवा (अ.४८४)
डोळे शिणले पाहतां वाटुली (अ.१५०८)
तुझे प्रेम माझ्या ह्रदया आवडी (अ.१५२४)
केधवा भेटिसी माझिया जिवलगा (अ.१५३७)
भेटीलागी माझा फुटतसे प्राण (अ.१५५८)
आरुष साबडे नेणें काही वेडे (अ.१५०७)
पंढरीचा वास्र चंद्रभागे स्नान (अ.१७०७)
स्फुंदत स्फुंदत नामा उभा व्दारी (अ.१७५५)

या भक्तीभावाच्या उत्कटतेस तोड नाही. तसेच त्यास दुस-या कोणत्याही भावनेचा स्पर्श नाही. हा एकपिंडी अविष्कार आहे.

**करुणरस :-**

वत्सल रसाप्रमाणे करुणरसही नामदेवांच्या अनेक भक्तीरस युक्त अभंगात मिसळून गेला आहे. विशेषत: ज्ञानेश्वरांची समाधि या प्रकरणातील करुणरसविष्कार ह्रदय स्पर्शी वाटतो. ज्ञानराज ब्रह्मी मिळाल्यानंतर बांधल्या तळयाचा पाट फुटून बारा वाटांनी ओघ वाहावेत किंवा हरीणीवांचून खोप ओस पडल्यावर पाडसे दशदिशांनी भ्रमावित तसी संतजनांची दयनीय दशा झाली. -

नामा म्हणे देवा घारगेली उडून । बाळे दानादान पडियेली, (अ.१०९७)

**हस्यरस:-**

नामदेव गाथेत हस्यरसाचा अविष्कार तुरळकपणे झाला आहे. नामदेवांचा 'बोबडा' म्हणजे हस्याचे रमणीय उदाहरण आहे. बाळकृष्णाच्या एका भाबडया सवंगडयाने केलेली आत्मनिवेदन हे या काव्याचे विषय वैशिष्ठय आहे. इतर मित्रमंडळींच्या मानाने आपल्याला गाई राखाण्याचे काम तेवढे खूप करावे लागले. पण खरवसाची वाटणी करताना मात्र आपल्यावरच नमेका अन्याय होतो म्हणून

कृष्णावर रुसलेला हा त्याचा बालमित्र म्हणतो.

कुला थमालले थमाळ आपल्या गाई
आम्ही आपुल्या घलासी जातो भाई ॥

या सवंगडयांचा बोबडेपणा त्याची निरागस वृत्ती त्याचा सात्विक संताप आणि अखेरीस 'तूं म्हनशिले ले याला कलतचि नाही ।' हा भोळा भाबडा आत्मसंतोष या सा-या तपशिंलाच्या अद्‌भूत संमीलनांतून हास्यरसोत्पतीचे अपूर्व वातारण होते. उपरोध व उपहास हे हास्याचे उपप्रकारही या काव्यात पहावयास मिळतात.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास भक्तीरसाचा उपयोग फार मोठयाप्रमाणात दिसून येतो. भक्तीतर रसांची उदाहरणे असी अल्पमात्रच आहे. नामदेवीय गाथा मुख्यत: भक्तीची गिता आहे. आंतरींची आर्तभक्ती व्यक्त करण्यासाठी नामदेवांचे बहूतेक काव्य अवतरलेले आहे. रसांच्या विविधतेपेक्षा एकच भक्तीरसाचा प्रकर्ष येथे आढळतो. खुद्द नामदेवांनाही जाणिव आहे असे वाटते. 'नव्हे हे प्राकृत पाठांतर कवित्व । हा उपनिषद मथितार्थ ब्रह्मरस (अ.९७०)

नामदेवांचे हे म्हणणे सर्वस्वी मान्य होण्याजोगे आहे.

**<u>अलंकार सौंदर्य:-</u>**

नामयाची वाणी सहजसुंदर आहे. तिला अलंकरणाची फारशी हौस नाही व जरुरीही नाही. तरीपण उत्कट भावाविष्काराच्या आवेगांत आलेली संयत आलंकारिकता या वाणीस शोभा देणे नामदेवगाथेत अलंकारांचे दर्शन सौम्य व नीटस आहे.

**<u>अनुप्रास :-</u>**

केशव कैवल्य कृपाळू (अ.७५४)नामा म्हणे सुरस सेवी सुधारस(अ.४९२) भक्त भागवत भाग्याचे (अ.१०३०) मनाचे मावळती मनोधर्म (अ.१५०१) संतसमागम साधी हे साधन (अ.२०६४) विटली वासना ओल्हावली (अ.१३८७) विठोबा जीवेंसि जडला जाण (अ.१२६५) अशी अनुप्रासांची अनेक सुंदर उदाहरणे नामदेवांच्या काव्यांत आढळतात.

**यमक :-**

यमकामुळे गेयनेत भर पडते, आणि नामदेवांच्या भावकवितेंत गेयनेचे महत्व अधिक आहे. दामयमक, पुष्पयमक, इत्यादी कसरतींच्या ऐवजी नेहमीचे अंत्ययमकच येथे आढळते.

"वारा धावे भलत्याठायां । तैसी माझी रंगळाया"

**श्लेष :-**

व्यक्तिनामांवर कोटी करण्याची हौस नामदेवांनी कवचित् स्थळी व्यक्त केली आहे.

नामा म्हणे हरिकथा हरि भवव्यथा (अ.७५०)

मुक्ताबाई मुक्त केली केशवराजे (अ.११८९)

श्लेषलंकाराचे एक सुरेख उदाहरण नामदेवगाथेत आढळून येते. एखादा शब्द चरणांत पुनः पुन्हा विविध अर्थांनी येतो, तेव्हा श्लेष हा अलंकार होतो. पुढील अभंगात 'शिवी' या शब्दाचा असा द्वर्थी उपयोग केला आहे.

शिंपियाचे कुळीं जन्म मज झाला । परि हेतु गंतळा शिवी

रात्रिमाजी शिंवी दिसामाजी शिवीं । आराणुक जीवींनाही काही माझ्या

नामा म्हणे शिवीं विठोबांचे अंगी । त्याचेनिमी जगीं धन्य झालो

'शिवीं' म्हणजे 'शिवतो' व 'शिवाच्या ठायीं या दोन अर्थांनी हा शब्द येथे किती अर्थघन झाला आहे!

**अर्थालंकार :-**

उपमा रुपकादी सर्व परिचित असे ठहक अर्थालंकार नामदेवांच्या काव्यांत दिसून येतात. यथासंख्य, प्रत्यनीक, परिसंख्या इत्यादी अल्पज्ञात अलंकार त्यांत आढळत नाहीत.

**उपमा :-**

गरुडपारीं उभे दाटी वैष्णवांची ।

उपमा वैकुंठीची पंढरीये ॥ (अ.८८९)

असा उपमेचा नामनिर्देश नामदेवांनी केला आहे. सार्थ आणि समर्पक

उपमांची अनेक उदाहरणे गाथेतून दाखवितां येतील -

दुर्दराचे परि जिव्हा वटवटी (अ.१७२६)

उभागा ठेलासी दर्भ जैसा (अ.१३७३)

तंव प्रेताचियेपरि पडला भूमिवरी (अ.१२६४)

बकाचियेपरि ध्यानस्थ राहिला (अ.५७०)

मातेचिया स्नेहें बालक बोबेडे । खेळवी ललें कोडे नेणे लाजो
नामा म्हणे तैसें तुम्ही माझे कवतुक । करुनी सुखें सुख वाढवितां
(अ.९२४)

**रुपक :-**

रुपकाच्या योजनेमुळे नामदेवांच्या कवित्वाचे अर्थसौंदर्य अनेक स्थळी विकासित झाले आहे. नामाचा ओगर (अ.८५०) अहंकाराचा वारा (अ.८८३) हरिनामाचे भाले (अ.८४६) गुरुकृपेचे अंजन (अ.१३९६) संसारखुंटा (अ.१४३६) नामाची सांगडी (अ.१४८७) प्रेमफासा (अ.१५२६) वासनेचा फासा (अ.१६०९) संतापाचे सदन (अ.२०६५) इत्यादी अनेक अर्थपूर्ण रुपकाबरोबरच कांही सांग-रुपकेंहि त्यांनी योजिली आहेत.

पंढरी माहेर विठ्ठल माऊली । धांवोनि हे बाली सांगावी जी
संसारगावी लेकी असे तुमची । चिंता कां तियेची सांडियेलि
सासुरवासिनी पाहातसे वाट । सांगावे कष्ट विठोबा माऊलीये
अव्हेर माझा असे अविचारु भावा । आशातृष्णा लावा वहिनीकां
चांडाळी हे सासू तृष्णा पापिणी । कांही केल्या धनी पुरोनेदी

अशीच आणखी उत्कृष्ठे सांग-रुपके अभंग १७९१ व १८०२ मध्ये आहेत.

**दृष्टान्त :-**

प्रस्तुत गोष्टीचा निर्देश करुन तिच्या स्पष्टीकरणासाठी अप्रस्तुताचा दाखला दिला म्हणजे दृष्टान्त हा अलंकार होतो. या अलंकाराचा उपयोग नामदेवांनी सढळपणाने केला आहे. प्रतिपादय विषय ठसविण्यासाठी त्यांनी केलेली दृष्टान्त योजना अतिशय कौशल्यपूर्ण आहे.

देवा आम्ही तुम्हां दिले थोरपण । मानी हे वचन सत्य माझे

रोग व्याधि पीडा जनासि नसतां । कोणपाचारितां वैद्यालागी

अनाथासी साहय होसी नारायणा । करुणावचना बोलविसी (अ.१४६९)

गणिके सत्वर मोक्षपद देसी । उपमन्यु बाळासी क्षीरसिंधु (अ.१६५५)

**व्यतिरेक :-**

उपमानाचा अपकर्ष दाखवून उपमेयाचे गुणाधिक्य वर्णिले असता व्यतिरेक हा अलंकार होतो.

"पूर्वपूण्या बळें लाधले तयासी । देता उपमेंसी उणा शुक"

**अतिशयोक्ति :-**

या अलंकाराची उदाहरणे ही अल्पच मात्रच आहेत.

नेमी अश्रुधारा पडती अपार । तेणे पृथ्वीवर पूरवाहे (अ.५८३)

मजहूनि उदार भक्त माझा । (अ.९५९)

तोचिमृग पाहा आला उदकासी । उड्डान गगनासी साधी असे(अ.५७८)

मृतिका पाषाण पंचकोशीचे खडे ।झाले पहा घडफुडे ब्रह्मरुप(अ.१०५३)

**व्याजोक्ति :-**

व्याजोक्तीच्या व्याजस्तुती व व्याजानिंदा या दोन प्रकारापैकी फक्त दुसरा प्रकार नामदेवांनी उपयोजिला आहे.

उराराचा राणा म्हणविसी आपणां ।सांगत्वा कवणां काय दिले(अ.१६४७)

तुम्हांसि मातेने धाडियेले वना । आमची विटंबना बहुत जाहली

लंकेपुढे आम्ही वेचियेले प्राण । तुम्ही ते दुरुन बाण टाका(अ.१६६९)

झेंगट घेऊनि हातीं ।दवंडी पिटीन तिन्ही लोकी

पतितपावन देवा परी । तुं मोठा घातकी (अ.१४३१)

**स्वभावोक्ति :-**

स्वभावोक्ति म्हणजे सहज शब्दांकन अंगभूत साधेपणा हे स्वभावोक्तीचे वैशिष्ठ्य नामदेवांना आवडले असावे. बाळकृष्णाचे नामदेवकृत वर्णन पहा

दोंदील दोंदील टमकत चाले । गोजिरी पाऊले हालोनियां

पायीं रुणझुण रुणझुणनि वाळे । गोपी पाहतां डोळे मन निवे(अ.२२३)

नामदेवीय काव्यांत आलेले हे सर्व अलंकार पाहिले म्हणजे एक गोष्ट जाणवते त्यांनी आपले काव्य एकंदरीने अलंकारादि, गौण गोष्टींनी नटविण्यापेक्षा त्यांत अंतरंग सौंदर्य आणण्याचाच अधिक प्रयत्न केला आहे. नामदेवांच्या भावसंपन्न व्यक्तिमत्वाचे अभिजात सैदर्य हाच त्यांच्या काव्याचा खरा अलंकार आहे.

## काव्यप्रकार

नामेदवांचा एकेक अभंग म्हणजे उत्कृष्ट 'भावगीत'(lyric) आहे. भावगितांत कवि आत्माविष्कार करतो. नामदेवांचे अभंग भावगीतात्मक आहेत, कारण त्यांची अभंग रचना आत्मलक्षी आहे.[३] त्यांच्या अंतःकरणाचे स्वच्छ प्रतिबिंब त्यांच्या अभंगातून उमटले आहेत. 'It is myself that I portray' हे म्हणणे नामदेवांच्या काव्याला लागू आहे. स्वतः नामदेव हांच त्यांच्या काव्याचा विषय आहे. तीर्थावळीतील प्रकरणातील ज्ञानेश्वर-नामदेव-संवाद, आत्मसुख प्राप्तीविषयीची नामदेवांची व्याकुळता इत्यादी प्रसंगी नामदेवांनी केलेली आत्मनिवेदने भाव रमणीय आहेत.

**प्रकट चिंतन :-**

नामदेवांचे काव्य हे प्रकट चिंतन आहे. त्यांच्या काव्यांचे स्वरुप त्यांच्या भाववृत्तीनेच निश्चित केले आहे. निराकार सद्वस्तुच्या काक्षात्कारासाठी साकार प्रतिमेचे ध्यान करीत भावेत्कट मनःस्थितीत त्यांनी काव्यरचना केली आहे. ही अतीव भावव्याकुळता साधकाच्या जीवनात अपेक्षित असते.

ज्ञानेश्वर-नामदेवांदि कवि मुख्यतः साक्षात्कारी संत होते. काव्यरचना हा त्यांच्या दृष्टीने ईश्वर भक्तीचाच एक पावन प्रकार होता. किर्तन भक्तीचे एक अंग म्हणून नामदेवांनी अभंगरचना केली. त्यांच्या काव्यावर अंतःकरणातील भक्ती भावनेचा ठसा उमटला आहे. ' वाहिली तुलसीदले स्वामीलागी'(अ.१२१८) प्रेमभक्तीची मधुरता व भावनांची कोमलता यांचा प्रत्यय नामदेवांच्या

कवीत्वांत येतो. 'तूं पक्षिणी मी अंडज' 'तूं गाय मी वासरु' 'तूं मेघ मी चातक' असे ते विठ्ठलाला सांगतात. 'तिन्ही लोकी पिकला असे जगज्जीवन' (अ.१८११) असा प्रत्यय त्यांना आला. 'बंध मोक्षाची फिटली काजळी ।समाधि लागली समाधीसी ॥' (अ.१८१८) अशी अवस्था त्यांना प्राप्त झाली नामदेवांनी निर्मिलेल्या प्रतिमा त्यांच्या काव्यातील सुचित भावानुभवाशीं एकरुप झाले आहेत.

कोटि दिवाळया दसरे । आम्हां हेचि झाले पुरे

घरोघरी ओवाळणी । विठ्ठल देखिला नयनीं (अ.१८१९)

यांतील अपुर्व आध्यात्मिक अनुभव नामदेवांनी जनसामान्याच्या परिभाषेत व्यक्त केला आहे. नामदेवांची प्रेमभक्ती व समाज्याची अभिरुची यात भावनात्मक समतोल आहे. 'प्रेमपिसें भरले अंती । गीतसंगे नाचोरंगी' या अनुभूतीने हरवलेली नामदेवांची भावगीते 'पारमार्थिक भावगीते' आहेत.

## "काव्यगुण"

कवीची पदरचना 'विशिष्ट-गुणवती' असावी, असे साहित्यज्ञ सांगतात. ते विशिष्ट गुण कोणते, याविषयी त्यांच्यात मतभेद असले तरी दंडी, भरत आणि वामन यांनी मानलेले प्रसाद, माधुर्य, ओज, सुश्लिष्टता समता, सोकुमार्य, अर्थव्यक्ति, उदारता, कांति व समाधि हे दहा काव्यगुण प्रमाण समजण्यास हरकत नाही.

**प्रसाद:-**

हा काव्यगुण शिरोभूत असून त्याचा अर्थ सुलभ अर्थप्रचीति असा आहे. नामदेवांचे सारेच कवित्व प्रासादिक आहे. अपरिचित शब्द योजना, प्रदीर्घ सामाजिक, रचना, दूरान्वय इत्यादी प्रसादहानि करणारे दोष त्यांच्या काव्यात आठवत नाहीत. 'अंतरीचे धावे स्वभावें बाहेरी' । अशी त्यांची रचना सहज सुंदर आहे रेशमाच्या लडीप्रमाणे त्यांतून अर्थ उलगडत जातो.[४]

संसारी असावे असोनि नसावे । (अ.१९७७)

आकारले तितुकें नाशिवंत (अ.१९७२)

नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे

संत पाय हिरे देती वरु (अ.१७७३)

उसाचे शेजारी येरंडाची झाडे ।

नाही तया चिपाडें गोडी आली (अ.१३४२)

झाड जाणावे फुले । माणस जागावे बोले (अ.१८७४)

नामदेवांची सारीच कविता अशी अर्थसुलभ आहे. सुगत अर्थग्रहणामुळे रसपरिपोषही सहजपणे होतो.

**माधुर्य :-**

माधुर्य हा काव्याचा दुसरा सर्वमान्य गुण आहे. शब्दातील वर्णाचे स्वरुप नाददृष्टया अनुकूल किंवा प्रतिकुल संवेदना निर्माण करणार असे. ते काव्यातील मधुर भाव मधुर वर्णयोजनेमुळे श्रवणमधुर होतो.

पंढरीरायाचा तूं प्रेमभांडारी । (अ.९२५)

संतरज उधळले । तेणें सर्वांग डवरले (अ.८४९)

भूमीचे मार्दव । सांगे कोभांची लवलव (अ.१८७४)

**ओज :-**

ओजोगुणाच्या अर्थाविषयी साहित्यज्ञांत एकमत नाही. परंतु साधारणपणे आवेश, जोर, सामर्थ्य या शब्दांनी व्यक्त होणा-या अर्थाचा अनुभव जेथे येईल, तेथे ओजोगुणोचे अस्तित्व प्रत्ययास येतें.

नामदेवांची वृत्ति, सात्विक, नम्र, प्रेमळ व भोळी भाबडी आहे 'आरुष साबडे नामे माझे वेडे'। हे वर्णन ध्यानात घेण्यासारखे आहे म्हणूनच नामदेवांच्या वाड्:मयात सामर्थ्यापेक्षा समर्पण आधिक आहे. हातीवीणा घेऊन राऊळामाझारी उभे असलेले नामदेव तहान-भूक विसरुन नामसंकीर्तन करतात.

**सुश्लिष्टता :-**

शैथिल्याचा अभाव असें सुश्लिषता या गुणाचे वर्णन दंडीने केले आहे. वाक्यातील शब्द एकमेकापासून तुटक पडले आहे असे वाटणे, किंवा योजिलेल्या शब्दांत काही ताठरपणा नाही असे जाणवणे म्हणजे शैथिल्य होय.

भेटीची आवडी उत्कंठित चित्त । न राहे निवांत एके ठायी
जया देखे तया हेंचि पुसे मात । कां मज पंढरीनाथ बोलवेना
सखे वारकरी पंढरीस जाती । निरोप त्या हाती पाठवीन (अ.१५३०)
कोटि सूर्य प्रभादीप्ती । गगनी झळकळी अवचिती
संत नामया सांगती । पैल आला कमलापती
गरुडांचे व धुंदुवाती । दाही दिशा आंकदती
हरिकंठीची सुमनमाळा । सुटुनि आली भूमंडला,

अशी सुश्लिष्ठ रचनेची अनेक उदाहरणे आहेत.

**समता :-**

नामदेवांच्या काव्यात समास बहुल कठोर वर्णयुक्त संस्कृतप्रचुर असे काहीही ते लिहित नाही.

वाढवेळ का लाविला (अ.१५४४)
रुपेंड दाखवा नेटें पाटे (अ.१५४६)
डोलियांचे डोळे उघडिले जेणे । आनंदाचे लेणे लेवविले (अ.१३७०)

अशी शुध्द मराठ माळी व सरळसाधी कविता नामदेवांनी लिहिली आहे.

**कोमलता :-**

ज्या लेखनांत कठोर अक्षरे नसतील किंवा ती फारच थोडी असतील, तें लेखन 'सुकुमार' होते कानाला मृदू लागणारी व अर्थदृष्टया कोणास न बोचणारी अशी कुसुमकोमल रचना नामदेवांनी केली आहे.

ध्यान सावळे गोकुळिचे(अ.२५२)
आषाढी कार्तिकी हेचि आंम्हां सुगी (अ.३६७)
ताव्हेंलो, भुकेलो तुझेनि नामे निवालो (अ.१४९०)
पाहूं दयारे मज विठोबाचे मुख (अ.१५६४)

## समाधि

काव्यातील समाधि हा गुण म्हणजे निर्जीव सृष्टीवर सजीवत्वाचा आरोप किंवा मानुषीकरण होय. शिवराय महात्म्य या प्रकारणांत वडील कुरंगी त्या चण्ड भिल्लाकडे येऊन म्हणते -

नका मारुं पति तृषेंने पीडिला । मारी तूं मजला तया आधी (अ.५९२)
समाधि या गुणाचा म्हणजेच चेतनागुणोक्तीचा उपयोग नामदेवांनी फारसा केलेला नाही.

**व्यक्तिचित्रे :-**

श्रीमंत लोक, सोइरेजन, धर्मभ्रष्ठ ब्राह्मण, भोंदु साधु, संतसज्जन इत्यादी व्यक्तींची नामदेवानी जाताजाता रेखाटलेली चित्रे प्रत्ययकारी वाटतात.

भक्तिस्तोत्र माजविणा-या वेषधा-याचे नामदेवांनी केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. हे लोक टिळे-टोपी-माळा परिधान करतात, पण त्यांची भक्ती कांचनिक असते. आम्ही हरिभक्त आहो, असे लोकापूढे ते सांगतात पण त्यांची मने विरक्त नसतात. (अ.१८३७-१९३९)

तीच गोष्ट कर्मठ व दांभिक ब्राह्मणांची ते कर्मनिष्ठेचा खोटा अभिमान बाळगात. ते नुसता गोसावीपणाचा वेष दाखवतात. पण अंतरी तो संघ विषयाचा । अशी त्यांची स्थिती असते.(अ.१८४३-१८४४)

नामदेवांच्या गर्वपरिहारप्रसंगी मुक्ताबाईचे घडलेले स्वभावदर्शन अतिशय प्रभावी आहे. मुक्तीकेचे जाणकार असलेल्या गोरोबांना 'जीवाशिवा भाजुनी ब्रह्म' करण्याची तिने केलेली विनंती गोरोबांनी आपले थापटने तिच्या मस्तकावर आपटल्यावर 'अमृत संजीवनी उतो आलि' अशी झालेली तिची अवस्था आणि
'अखंड जयाला देवाचा शेजार । कारे अहंकार गेला नाही ।'
या शब्दात तिने घेतलेली नामदेवाची हजेरी हे सर्वच प्रसंग अल्पाक्षर रमणीय आहेत 'लहानशी मुक्ताई जैसी सणकोडीं' हे नामदेवांनी केलेले तिचे वर्णन फार बोलके आहे.

# नामदेवीय वाङ्:मयाची छंदोरचना

पद्यबध्दता हा जणू प्राचीन मराठी वाङ्:मय निर्मितीचा अविभाज्य घटकच आहे. आद्यकवि मुकुंदराजापासून समर्थ रामदासापर्यंतच्या बहुतेक सर्व साधूजनांचे साहित्य पद्यात्मक आहे. त्यातही पुन्हा हे सारे लोक ओवी - अभंगासारख्या सुलभ छंदाकडे गेले नाहीत.

**अनुकरण शिलता [५]:-**

ज्ञानेश्वरांच्या उत्कृष्ठ अभंगांचा आदर्श नामदेवासमोर होता तो वस्तुपाठ त्यांनी सहजपणे गिरिवीला असण्याची बरीच शक्यता आहे.

**रचनासौंदर्य :-**

हे कारण तर नामदेवासारख्या अव्युत्पन्न कवीच्या सोयीचे आहे. 'नव्हे बहुश्रुत, नव्हे ज्ञानशील' आणि 'अभंगाची कळा नाही मी नेणत' असे नामदेवांनी म्हटले आहे. गणवृत्ते आणि मात्रावृत्ते यातील रचनेस अपेक्षित असलेला वृत्तविषयक बारकावा त्याच्याजवळ नव्हता त्या दृष्टीने त्याच्या सहज-काव्याला अभंग हे वृत्त मानवले यात नवल नाही.

नामदेवांचे कवित्व स्फुट स्वरुपाचे आहे एखादया विशिष्ठ सलग, प्रदीर्घ आणि पांडित्य प्रचुर रचना त्यांस करावयाची नव्हती. त्यांच्या भावगितात्मक काव्यातील एकेका उत्कट भावनेचा अविष्कार अपरिहार्यपणे आणि अभावितपणे अभंगवृत्तातून झाला.

**नामदेवांचे अभंग रचना शास्त्र :-**

आपल्या अभंग रचना शास्त्राची माहिती नामदेवांनी दोन ठिकाणी दिली आहे.

अभंगाची कळा नाही मी नेणत । त्वरा केली प्रीत केशीराजे
अक्षरांची संख्या बोलिले उदंड । मेरु सुप्रचंड शर आदीं
सहा साडेतीन चरण जाणावे । अक्षरे मोजावी चौक चारी
पहिल्यापासूनी तिस-यावर्यंत ।अठरा गणित मोज आलें
चौकचारी आधी बोलिलो मातृका । बावीसाची संख्या शेवटील

दीड चरणांचे दीर्घ ते अक्षर । मुमुक्षु विचार बोध केला

नामा म्हणे मज दिले हरी । प्रीतीने खेचरी आज्ञा केली

नामदेवांनी दिलेली ही लक्षणे मोठया अभंगास लागू पडतात. अक्षर संख्या व दीर्घ अशी ही रचना आहे. अभंग या छंदाची नामदेवांनी पुढील वैशिष्ठये सांगितली.

१) या अभंगाच्या एका चौकात सोडेतीन भाग (चरण) असतात.

२) अभंगाची एकूण अक्षर संख्या बावीस असते.

३) पहिले तिन चरण प्रत्येकी सहा-सहा अक्षरांचे असतात.

४) शेवटच्या अर्धाचरणात चार अक्षरी असतात.

५) असे बावीस अक्षरी चरण सहा झाले म्हणजे एक अभंग होतो.

नामदेवांची रचना बहुशः अशा बावीस अक्षरी,सहा चरणी अभंगाची आहे-

छंदाधिस्थ हे मन माझें पंढरिनाथा । न सोडी सर्वथा पाय तुझे

यासि काय करुं सांगाजी विठ्ठल । स्नहेका लाविला पूर्वीहूनि

कासवांची पिले राहोनि निराळी । दृष्टि पान्हावली अमृतमय

तैसा मी जवळूनि असेन हो दुरी । दृष्टि मजवरी असो द्यावी

तान्हे वत्स घरीं वनीधेक चरे । परतोनि हंबरे क्षणक्षणां

नामा म्हणे सलगी करीन निकट । झणे मज वैकुंठ पद देसी(अ.१६५४)

ही रचना थोडीफार सैल अशीच आहे. एका चौकांत सोडेतीन चरण आणि सहा चरणांचा एक अभंग, ते बंधन येथे पाळले असले, तरी ६+६+६+४ या ठराविक अक्षरसंख्येचे बंधन काटेकोरपणे पाळलेले नाही. नामदेवांची बहुसंख्य अभंगरचना अशी शिथिलच आहे.

**काही काव्यदोष:-**

६नामदेवांच्या काव्यविशेषांच्या चर्चेत गुणसंकीर्तनानंतर दोषाविचार कमप्राप्तच होतो. कवि हा निरंकुश असून, त्यांच्या कवित्वांतील उणीवांकर बोट ठेवणे चुकीचे आहे.'शब्द बापुडा केवळ वारा'हे योग्य आहे म्हणून थांबून उपयोग नाही.

नामदेवांच्या कवित्वांत शब्दयोजनेसंबंधी आणि अर्थ प्रतीतीविषयी असे

व्दिविध दोष आढळतात.

<u>**चुकीची शब्दयोजना :-**</u>

'नामा म्हणे महादेवा ।चुकवी चौ-याशीचा हेवा'(अ.६०७)येथे हेवा (मत्सर) हा शब्द केवळ यमकासाठी आला आहे तेथे वास्तविक फेरा हा शब्द हवा. तसेंच 'घेऊनिया गेला सारा तेणे'(अ.१५९५)या चरणांत तेणे याऐवजी तोहि असे रुप हवे.

<u>**यमकदोष :-**</u>

नामा हे महिमान जाने । घेतो विठ्ठलाची आण (अ.७०६)

<u>**अर्थविषयक उणीवा: ग्राम्यता :-**</u>

अष्टदळ काढिलें अंगणीं । वरी मुते चक्रपाणी(अ.६४)

लक्ष्मीने ज्यातें असे आराधिले । ठेवी ती पाऊले स्तरावरी (अ.१६१)

<u>**पुनरुक्ति :-**</u>

माता विठ्ठल पिता विठ्ठल (अ.३६२)

विठ्ठलाचे माता विठ्ठलाचे पिता(अ.४७९)

विदुराच्या कण्या खाय धणीवरी (अ.४८७)

विदुराच्या कण्या गोडकरी(अ.४९२)

<u>**क्लिष्टता व संदिग्धता :-**</u>

काही कल्पना क्लिष्ट, गूढ, संदिग्ध किंवा अपरिचित असल्या, किंवा रचना दुरान्वित असल्या, तर दुर्बोधता, निर्माण होते-

गुंजावर्ण डोळे शिरी बाबर झोटी (अ.४५९)

योगनिद्रेसी पहुडला । आदिपुरुष उपवर झाला (अ.५१३)

नमो त्रिगुटी आगटा (अ.१०१७)

एक उगवली आरडी दरडी(अ.१२४९)

संसारसांने या येऊनि भाग्याचा (अ.१३२३)

निवृत्तिदेवे म्हणे चला गुंफेमंधी(अ.१३५०)

शहाणे सिणले मानसी । तत्पलोह उदकग्रासी (अ.१७८७)

# नामयाची वाणी

वरील काव्यदोष अपवादभूत असून नामदेवांचे एकूण कवित्व 'अर्थ बोलाची वाट पाहे ।' याच कुळीतले आहे. या कवीच्या घरची शब्दरत्नें अर्थपूर्ण, अपूर्व आणि अमोल आहेत. नामदेवांच्या अभंगगाथेत भावभक्तीच्या मंदाकिनीचा प्रवाह जसा वाहतांना दिसतो, तशीच या प्रवाहिनीच्या तीरावर सुरेख शब्दपुष्पेंही उमललेली दिसतात. आपल्या भावाविष्कारास साजेसा अर्थवाही शब्दसंसार नामदेवांनी गोळा केला आहे. त्यांत असोस, अमूप, आगडधूत, आळुका, आरुष -साबर्डे, आराणूक आख्या, इतुकले, उभड, अंकणा, अंजुळ, कुडावा, केर्णे, कुंदा, खेव, वारवोरी, वाटगें, शिराणी, शाहणीक, सांडोवा, सुखाड, आनंदवन, नटनाटय, स्वस्तिक्षेम, रजरेणु असे तत्सम सामाजिक शब्दहि त्यांना सहजपणे सुचतात. 'काव्य म्हणजे भाषेतील संगीत' ही उक्ति नामदेवाच्या शब्दप्रभुत्वाचा प्रत्यय आणून देण्यासाठीच नव्हे, तर मराठीचे शब्दागार संपन्न करण्याच्या दृष्टीनेही गाथेतील शब्दसंग्रहाचे महत्व विशेष आहे.

नामदेवांची अभंगवाणी स्वत:ची एक परंपरा घेऊन विकसित झाली आहे. ही अभंगवाणी तुकारामामध्ये कळतास पोचली आहे. मराठीतील संत पंत कवींनी तिची जोपासना तर केलीच पण फादर स्टीफन्स व शेख महंमद याच्या सारख्या परधर्मीय कवींनीही तिच्यांत यथाशक्ति भर घातली आहे.

अभंग या वृत्तांतून आत्मप्रकटीकरण करुन नामदेवांनी कवित्व रससिध्द असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांच्या उत्कट, आर्त वाणींतून त्यांचे सह्रदय व्यक्तिमत्व प्रतिबिंबित झाले आहे. त्याचे वर्णन कसे करावे? 'संतांची हे कळा पाहतां न कळे । खेळोनिया खेळ वेगळाचि ॥' असे स्वत: नामदेवांनीच म्हटले आहे.

संतपरंपरेत सातत्य टिकावे म्हणून नामदेवांनीही विठ्ठलाच्या प्रेरणेने आणि ज्ञानेश्वरादि संतसखेजनांच्या साहाय्याने आपले तसेच ज्ञानेश्वरांचे चरित्रच आपल्या अभंगवाणीच्या रुपाने लिहून ठेवले आहे.

# नामदेवांचे तत्वचिंतन

नामदेव हे संत-कवि असल्यामुळे संतत्वाच्या भूमिकेतून त्यांचा साहित्याविष्कार घडला आहे. ते मुख्यतः साक्षात्कारी संत आहेत. काव्यरचना हा त्यांच्या विठ्ठलभक्तीचाच एक प्रकार आहे. नामदेवांचा पिंड भक्ताचा आहे. तत्वज्ञानाचा नव्हे, हे मान्य करायलाच हवे. तरीहि नामदेवांसारख्या आर्त भक्तास अनुभूतीच्या अवस्थेत जगाविषयी आणि परमेश्वराविषयी कांही सांगावेसे वाटते आणि तेवढयापुरतें तरी तत्वदर्शन त्यांच्या काव्यांतून घडते. म्हणूनच भाष्यग्रंथांतून व्यक्त होणा-या तत्वचिंतनाचा बांधेसूदपणा नामदेवांच्या काव्यांतून प्रतीत झाला नाही, तरी अव्दैत आणि भक्ति यांच्या संमन्वयांतून प्रकट होणारे विचारसौंदर्य येथे प्रकर्षाने जाणवते. 'त-ही अव्दैती भक्ति आहो ।' (ज्ञानेश्वर १८-११५१) अशीच नामदेवांची विचारधारणा आहे.

**तत्वचिंतनाची रुपरेषा :-**

नामदेवांच्या तत्वचिंतनास ऐहीक आणि परमार्थिक अशी दोन प्रमुख अंगे आहेत. व्यवहार निरुपण व नीतिपर उपदेश यादोन वैशिष्ठयांनी त्यांचे ऐहीक तत्वविवेचन सिध्द झाले आहे. नामदेवांचे परमार्थीक वत्वदर्शनेही त्यांच्या अभंगगायेतून घडते.

जीव, परब्रह्म आणि जड सृष्टि यांचे अन्योन्य संबध कोणत्या प्रकारचे आहेत, याचा विचार करुन या तिन्हीचे ब्रह्म स्वरुपात एकीकरण होणे शक्य आहे किंवा नाही व असल्यास ते कोणत्या प्रकारे होते. याचे सुक्ष्म विचार सिध्दात मांडणारे शास्त्र म्हणजे तत्वज्ञान. नामदेवांचे तत्वचिंतन यांच परंपरेतील आहे.

'असोनि निराळा सुमनाचा वास ।तैसा हृषिकेश जीवां सकळा।'(अ.७७५)

'बीजाचिये पोटीं वटाचा विस्तार ।सर्व तो आकार तुझा असे'(अ.१०४०)

अशा वचनातून नामदेवांनी जीव-जगत-परब्रह्म-संबंध विशद केले आहेत.

**धर्म आणि तत्वज्ञान :-**

तत्वज्ञान हे देखील त्या काळी धर्म भावनेशी निगडित होते. 'धर्मसारमिंद

जगत' (वाल्मिकी रामायण ३-९-३०) धर्म हे जगाचे सारतत्व आहे.'जे धर्मजात आघवें ।यगीं युगीं मियांचि रक्षावें ॥ लोकजीवनाचे प्राणतत्व असलेला धर्म लुप्त होऊ नये म्हणून त्यांच्या रक्षणाची जबाबदारी परमेश्वराने आपल्या शरीरावर घेतली आहे. ज्ञानेश्वर-नामदेवादि संताची धर्मकल्पना आध्यात्मनिष्ठ होती. आपल्या आधात्मीक जीवनाचे तत्वज्ञानच त्याने स्वतःच्या काव्यातून मुखरित केले आहे. 'म्हणोनि देवो गोसावी । तो धर्माधर्म भोगवीं ।' तेव्हा धर्म सत्ता व ईश्वर सत्ता ती एकरुप आहेत अशी त्यांची दृढ श्रध्दा होती.(ज्ञाने.१६३०)

**काव्य आणि तत्वज्ञान [७] :-**

नामदेव हे आतून भक्त आहेत. रससिध्द कवि आहेत आणि परमार्थप्रवण तत्व चिंतक आहेत. हे आतूर भक्त विठोबाच्या राज्यात नित्य दिवाळी अनुभवतात.(अ.३७८) नामदेवांच्या रससिध्द कवीत्वाचा प्रत्यय त्यांच्या अनेक अमृतवचनातून येतो. वैकुंठासी शिडी लावलेली (अ.१०५७) 'अंकुरला गाभा विराटाचा' (अ.११८४) 'नभाचि अंतरा कालवले ।'(अ.११८५) अशा अनेक भारदार कल्पनांची पखरण त्यांच्या अभंगातून आढळते. या अभंग रचनेमागील भूमिका पारामार्थिक तत्वचिंतकाची असल्याचे सारखी मधूर असलेली नामयाची वाणी (अ.७६५) जगी ज्ञानदिप लागवण्याची प्रतिज्ञा करते(अ.१३९२) .'ज्ञानाचे सौभाग्य भक्ती आणि वैराग्य' (अ.९४२) हे या पंढरी रायाच्या प्रेम भांडा-याचे सांगणे आहे. यामुळेच नामदेव हे 'तत्वज्ञ भक्तकवि' आहेत, असे सार्थपणे म्हणता येईल. ते भक्तीप्रेमी महापुरुष आहेत. देव, नाम, कीर्तन, सत्संग, संत, भक्त आणि समस्त जगत व जीवन या सर्वावर त्यातील इशतत्व जाणून त्यावर अपार प्रेम करणारा संत विरळा. आणि म्हणूनच-

घालीन लोटांगण वंदीन चरण
डोळा मी पाहीन रुप तुझे
प्रेमे अलिंगन आनंदे पूजीन
भावे ओवाळीन म्हणे नामा

या नेहमी म्हटल्या जाणा-या चरणांमधून नामदेव महाराज घराघरात जनसामान्यपर्यंत पोहचले आहेत. विठोबाच्या चरणी डाव मिळविण्यातच या दुर्लभ जन्माचे व देहाचे सार्थक आहे. हे निजगूज ते कळवळयाने सर्वांना सांगतात.

पांडुरंगा इतकेच नामही प्रभावी आहे. "आम्हासि तो तुझे नामाचि पाहिजे" असा आग्रह नामदेवराय धरतात. कारण नामस्मरणानेच पांडुरंगाची भेट निश्चितपणे होते. हेच त्यांचे वर्म आहे. त्यांचे नामच भव सागरातून तारुन नेते. त्या नामाची गोडी काय सांगावी.

"अमृताहूनी गोड नाम तुझे देवा"

असा अनुभव ते सर्वांना देतात.

**<u>तत्वचिंतक नामदेव :-</u>**

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया

नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार ॥

हे संत बहिणाबाईचे उद्‌गार सूचक आहेत. महाराष्ट्रातील भक्तीपंथाचे जे तत्वज्ञान सिध्द झाले, त्याच्या उभारणीत ज्ञानेश्वर-नामदेवांनी बजावलेल्या कामगिरीची पावतीच येथे बहिणाबाईनी दिली आहे. भक्तीपंथातील भोळया भक्ती भावाला ज्ञानेश्वरांनी अध्यात्म्य ज्ञानाची बैठक मिळवून दिली. आतापर्यंत वेदोपनिषदांत अडकून राहिलेली ब्रह्मविद्या त्यांनी सामान्य जनानांहि उपलब्ध करुन दिली. मराठीच्या नगरीत त्याने ब्रह्मविद्येचा सुकाळ करुन सोडला.

'दिसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा

रिघो महाबोध सुकाळा । माजीं विद्य(ज्ञाने.१३-१७३)

परब्रह्म सर्वांच्या डोळयांना दिसो सुखाचा उत्सव उदयास येवो आणि सर्व जग ब्रह्मज्ञानाच्या विपुलतेंत प्रवेश करो, हेच ज्ञानेश्वरांचे एकमेव ईप्सित आहे. त्यांनी आपले गीताभाष्य लिहून भक्तीपंथाला आध्यात्मविद्येचे तत्वज्ञान प्राप्त करुन दिले व अशा प्रकारे भागवत धर्म मंदीराचा पाया रचला.

# नामदेवांचे ऐहिक तत्वचिंतन

**व्यवहारिक शिकवण :-**

'संसारी असावे असोंनी नसावे'(अ.१९७७) हे नामदेवांच्या व्यवहारिक शिकवणुकीचे सार आहे. नामदेव सांगतात प्रपंच उलिसा असला, तरी तो लटता आहे तो एक मृगजह डोह आहे(अ.१८८२) 'फुटल्या घडयाचे नाही नागावणें । संसार भोगणे तेणे न्यायें ॥ म्हणूनच संसार हा 'वाऊगा पसार जायजणा' अशी स्थिती आहे(अ.१९६२) गारुडयाचा खेळ क्षणभर खरा भासावा, तसा हा संसार आहे(अ.१९५७) प्रपंचाचे बंधन परमेश्वरानेच आपल्या गळयात आडकविले आहे. 'मज बांधले त्वां संसारखुंटी ।'(अ.१४३६)

संसार सागर हा दुस्तर आहे. यात 'विवेकी पोहणारा विरळा संत ।' येथे कामाच्या लाठा अंगावर आदळतात व भ्रम हा भवरा गरगरा फिरवितो. 'नाम म्हणे थोर उबगलो संसारी'(अ.१४२४) या अशा दुखःद संसाराचा उबग येऊन नामदेव 'संसाराचे बीज मूळ खोडी ।(अ.१६५९)असे विठ्ठलाला विनवतात.

या संसारात आपले असे खरेच कोणी नसते सगे-सोयरे हे तेवढया पुरतेच 'मोहाची सोयरी मिळोनि चोरटी । खाऊनी करंटी घेती घरा'(अ.१९६५) इष्टमित्र, सखेजन हे लटिकेच होत. अंतकाळी ते पाठमोरेच होतात.(अ.१९६७) 'एकलेची येणे एकलेची जाणें ।'हाच येथील न्याय आहे.

प्रपंच एवढा तापादायक असला तरी त्याचा सर्वस्वी त्याग करावा, असा उपदेश मात्र नामदेवांनी कोठेही केला नाही. वाटसरुने रात्री वस्तीस यावे आणि सकाळी उठून निघून जावे त्याप्रमाणे संसाराची सोडवण करावी. असे त्यांचे म्हणणे आहे. 'आलो मी संसारी गुंतला व्यापारी' हा आयुष्याचा हिशोब बरोबर नाही. आयुष्य क्षणोक्षणी कमी होत आहे. अखेरीस 'हे गे आयुष्य हातोहाती गेले' हीच चुटपूट शिल्लक राहते.(२०६३) असे नामदेव सांगतात.

**नामदेवांचा नैतिक उपदेश :-**

नामदेव स्वतःच्या धर्म पत्नीविषयीहि मन निरासक्त ठेवावे असे सांगतात. परस्त्रीचा तर त्यांनी कडक निषेध केला आहे. 'संग खोटा परनारीचा । नाश

होईल देहाचा ॥' असे ते बजावतात. "पहा परदारा जननिये समान" असे त्यांचे सांगणे आहे. तसेच 'परदारा परधन, परनिंदा, परपीडा ।' सांडोनि भजन हरीचेकरा (अ.१८१८) हेच सर्व शास्त्राचे सार आहे.

**<u>दैवी गुण :-</u>**

आपल्या अभंगातून काही दैवी गुणांचे महत्व त्यांनी सांगितले आहेत. दान-धर्म, दया-क्षमा, शांती, संतोष, समाधान इत्यादी सद्‌गुणांचा महिमा गातांना त्यांनी सदाचाराचा एक भव्य आदर्श उभारला आहे.'दया, शांती, क्षमा हेंचि पै भूषण' अशी नामदेवांची श्रध्दा आहे(अ.६६२) निंदेला महत्व देऊन आपली मनःशांति गमावूं नये. निदकांना खुशाल निंदू दयावे. "निदा स्तुति ज्याला समान पै झाली । भावे त्यांची स्थिति आली समाधीसी ॥" शत्रुमित्रांना समान लेखण्याचे ज्याला साधते तोच देवाला आवडतो.लोक आपली निंदा करतात, तोच आदरसन्मान समजावा.नामदेवांच्या नैतिक उपदेशाचे सारतत्व खालील अभंगात आहे

"दुर्लभ नरदेह झाला तुम्हा आम्हा । येथे प्रेमा रामोबाचा
अवघे हातोहाती तरो भवसिंधु । आवडी गोविंदु गाऊं गीती
हिताचिया गोष्टी सांगू एकमेका । शोक, मोह, दुःख निरसूतेणे

स्वधर्माचरण, कुलधर्मपालन, जातिनिरपेक्ष भक्तीयोग, दयाक्षमाशांति या सारख्या तत्वांचे परिपालन या सर्वातून त्यांनी स्वकालीन समाजासमोर आदर्श आचारसंहिता उभी केली आहे.

नामदेवांच्या उद्‌देशपर अभंगवाणीने सर्वमान्य व्यक्तीला 'मार्गाधारे वर्तन' करण्याचा संदेश दिला आहे.

**<u>नामदेवांचे भक्तिशास्त्रः-</u>**

नामदेवांचे भक्तिशास्त्र भारतीय भक्तीकल्पनेच्या परंपरेतील एक बलस्थान आहे. गुढ आत्मतत्वाला सुलभ व सर्वसेव्य रुप देऊन त्यांची सश्रध्द अंतःकरणाने उपासना करण्याची परंपरागत भक्तीकल्पना नामदेवांनी उचलून धरली आणि अव्दैतवाद, सगुण भक्तियांची सागड घालून त्यांनी भक्तीपंताचा प्रभावी प्रचार केला.

भक्तितत्वावरील अनन्य निष्ठा हा नामदेवांच्या जीवनाप्रमाणेच त्यांच्या काव्याचाही प्रमुख विषय आहे. 'तो हा राजमार्ग सर्वाहूनि चांग ।'(अ.९६८) 'करुं भाग्वत धर्म'(अ.१४२९) आणि 'वेगीं विठोबाचा पंथ धरा हे त्यांचे उद्गार भक्तीतत्व निरुपण हे त्याच्या काव्याचे मुख्य प्रतिपाद्य असल्याचे स्पष्ट करतात.

**भक्तिकल्पनेचे स्वरुप :-**

'सा (भक्तिः) परानुरक्तिरीश्वरे' ईश्वराच्या ठिकाणी पर म्हणजे निरतिशय अशी जी प्रीति तिला भक्ति म्हणतात.[८]

एकतत्व विठ्ठल हे त्रिभुवनीचे सुख आहे त्याचे गुणनाम आढवले म्हणजे मनचि नाही होते व अनुभवाचे पाय चालू लागतात. विठ्ठलाचे पवाडे त्यांच्यासमोरच सांगितले की, मुक्तीची कवाडे उघडतात. म्हणूनच जो हरिरंगी वाचतो, तो सदैव सभाग्य होय. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी व चतुर्विध भक्तांनी कमाने वाढते आत्महित केले आहे.

**नामदेवांचा अल्प दैवतोपासकास उद्देश :-**

नामदेव हे विठ्ठलाचे निष्ठावंत उपासक होते. वेगीं विठोबाचा पंथ धरा ।(अ.२०७७) हेच त्यांचे सांगणे आहे. त्यामुळेच विठ्ठलेतर देवदैवतांच्या उपासकांविषयीचा त्यांचा दृष्टीकोन समजून घेतला पाहिजे. विठ्ठल नामाच्या बरोबरीने प्रभूराम व शंकर या दैवतांचाहि तितकाच सादर नामोलेख त्यांनी केला आहे.

राम म्हणता रामचि होसी । भाक घेई मजपाशी ॥(अ.१९९१०)

शिव ऐसा शब्द कल्याणदायक । जाणती भाविक साधुजन(अ.५५८)

किंबहूना, विठ्ठल राम व शिव या तिन्ही देवतात सर्वस्वी अभेद आहे, अशीच नामदेवांची धारणा आहे.

शंभु उपदेशी भवानीसी । रामनाम जपे मानसी ॥(अ.७२९)

रामकृष्ण वासुदेवा । हाचि सर्व जिवांचा विसावा ॥

येथे पोकारुनिया द्यावा । विठ्ठलनाम उच्चारी (अ.७६३)

तसेच, 'नामा म्हणे शिव विष्णु एकरुप । '(अ.५५८) भक्तिपंथात साधकाची

भक्तिभावना प्रमुख आहे आणि प्रतिमाही गौण आहे. सर्वव्यापी परमात्मा विविध रुपांनी नटलेला आहे. याची नामदेवांना जाणीव होती. 'आत्मत्वाच्या यागेपाहूं जाता । नाही निरंतर भिन्न देवता ॥' विविध देवतामधून एकाच आत्मत्वाचा प्रत्यय येत असल्याने ती अभिन्नच आहेत असे ते सांगतात.

**भक्तिमार्गाचे अपुर्वत्व [९]:-**

भक्ति ही अनेक वैशिष्टयांनी युक्त अशी संजीवनी आहे. उदारता, व्यापकता, सुलभता, सर्वसमावेशकता यांमुळे भक्तीचा मार्ग अपूर्व ठरला आहे.

विठ्ठल भक्ती ही प्रापंचिक दुःखे दूर करणारी अमृतवल्ली आहे. 'अवघा संसार करीन सुखाचा । जरी झाला दुःखाचा दुर्धरु हा ॥' असे नामदेव आत्मविश्वासने सांगतात. विठ्ठलनाम मनोभावे गाइल्याने चित्त सुखावेल, विटेसहित चरणी मस्ककीं धरले म्हणजे आपली तनु निवेल, संतसयागमे कीर्तनरंगी नाचल्यावर त्रिविध तापांची धुणी होईल, असे ते सांगतात.

'बोलू ऐसे बोल । जणे बोलें विठ्ठल डोले ।

प्रेंम सर्वांगाचे ठायी । नाचे विठ्ठल रखुमाई ॥

हे वर्णन भक्तीप्रेमाने बहरलेले आहे. (अ.१५२२)

**नामयाच्या वाणी चे तत्वसार :-**

नामदेवांनी देवांचाहि देव असलेल्या विठ्ठलाच्या भक्तीच्या बीजारोपण व विकसन केले. देव ह्रदयात आहे, दगडांत नाही, (अ.१५२२) तो सर्वाभूती आहे. ज्ञानापेक्षा भक्ति बरी, कारण तेथे अहंकार नाही, नाम हेच धर्माचे सारसर्वस्व आहे. भक्ताला कलिकाळांचे भय नाही. संसारात राहून, चातुर्यवर्ण्य सांभाळून ईश्वर प्राप्ति होते.[१०]

आपल्या तत्वज्ञानाने त्यांनी जनसामान्यांचे आंतरिक जीवन आनंदमय केले. भक्तिविचाराचा भव्य आदर्श उभारुन लोकांत जीवननिष्ठा उत्पन्न केली.

त्यांनी आपल्या अभंगवाणीतून नैतिक वर्तनाचेही वस्तुपाठ मांडले आहेत. क्षमा, कर्तव्य, भूतदया इत्यादी नैतिक मूल्यें स्वजनांना सांगितली तसेच सदाचार संपन्नता शिकवली.

नामदेवांची अभंगवाणी ओघाने व अनुषंगानेच प्रपंचाचा परामर्श घेते, पण तिची एकंदर वाटचाल अध्यात्माच्या दिशेने आहे. परमार्थ साधन हे जीवनाचे अंतिम व अत्युच्य ध्येय आहे. अशी नामदेवांची दृष्टि आहे. ही दृष्टि ज्ञानेश्वरांच्या वैचारिक परंपरेस अनुसरुनच आहे. म्हणूनच 'सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचा जो जिव्हार' हे जनाबाईचे म्हणणे लौकीकार्थाच्या स्नेहभावापेक्षा वैचारिक सख्यांचेच खरे निदर्शक आहे.

## नामदेवांचे पसायदान[११]

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझियां सकला हरिच्या दासा
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी । ही संत मंडळी सुखी असो
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझिया विष्णु दासां भाविकांसी
नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग

<u>संतशिरोमणी नामदेवांच्या कवितेमधील प्राचीन मराठीची साक्षः-</u>

प्रीती पडीभरे, अवसरु संभ्रमु, आसक्त, मोहरत, तापत्री संतप्त रजरेणु, भातेठाकीन, फावली, न संडिती, आर्त, हासिन्नले, विसरु, साकडे, दाटले, पैलपारु, लल्लाटि इत्यादी शब्द प्राचीन मराठीची साक्ष देतात.

नामदेव केवळ कवित्व करुन थांबले नाहीत इतर संतांनी केले नाही असे अधिक मोलाचे कार्य त्यांनी करुन दाखविले. आयुष्याची चोपन्न वर्षे भागवत धर्माच्या प्रचारासाठी वेचली. प्रचाराची प्रवासाची फारशी साधने हाताशी नसताना, नामदेवांनी जे कार्य केले ते आश्चर्यकारक होते. हे कार्य करताना त्यांनी कोणताही स्वार्थ पदरी बाळगिला नाही. आणि म्हणूनच ज्ञानदेवांनी नामदेवांबद्दलचा आपला मनोभाव या रितीने प्रकट केला.

'भक्त भागवत बहूसाल ऐकिले । बहु होवूनि गेले होती पुढे
परिनामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व । हा रस अद्भूत निरुपम
हे सुख विश्रांती नाही हो कल्पांती । विचारावे संती दुरदृष्टी
हे खुण जाणती एक पंढरीराव । रुखमादेवी ना हो श्री विठ्ठल

आपणालाही असाच मोह होतो की संत नामदेवांसारखा भक्त आजवर झाला नाही व या पुढेही तो होणे नाही.

# समारोप

गीतेवर सुविस्तृत भाष्य लिहून ज्ञानेश्वरांनी मनःशांतीचा मार्ग दाखविणारे, निष्काम कर्मयोगाचे व ज्ञाननिष्ठ भक्तीचे तत्वज्ञान मराठीत मांडले. परंतु ज्ञानदेवांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाप्रमाणे वाङ्‌मयी मुर्तीचेही अंतरंग जनसामान्यांना गुढच राहिले. ज्ञानेश्वरी निगमावली आहे. चैतन्याचा दिप आहे. हे नामयाने जाणले आणि म्हणून म्हणतात.

ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी । एकतरी ओवी अनुभवांवी

हा अनुभव घेऊनच त्यांनी इतरांनाही या अनुभवांची गोडी आपल्या मधूरवाणीने चाखविली. भक्तीतत्वावर अचल निष्ठा ठेवून इतर बांधवांनाही हा सोपा मार्ग सरळ करुन दाखविला. तसेच ज्ञानेश्वरांचे चरित्रही लोकांसमोर ठेवले.

त्यांच्या अभंगातून नामभक्तीचा सद्‌वर्तनाचा निरासक्त वृत्तीचा व कळवळयाचा निरोप सांगितला आहे. या महाराष्ट्राच्या स्मृती आहेत त्या जपून त्यावर योग्य संस्करण करुन पुढच्या पिढीपर्यंत नेण्याचे कार्य विसाव्या शतकातील अभ्यासार्थिचेच नाही का?

सुखाचीये ताटी सुखची वोगरी । तृप्ती होईल थोरी क्षुधा तुरा(अ.९२५)

या ज्ञानेश्वरांच्या विनंतीस अनुसरुन नामदेवांनी आपल्या अमृत वाणीने आतुर भक्तांना तृप्त केले आहे. आपण तृप्त, समाधानी झालो आहोत हा तृप्ततेचा, समाधानाचा वारसा तर आपण जतन करुन ठेवूयाच आणि तो पुढील पिढीसही मार्गदर्शनार्थ ठेवूया.

## संदर्भ टीपा


१) संत नामदेव हेमंत विष्णू इनामदार
केसरी - प्रकाशन - पुणे - पृ.क. २०६

०२) तत्रैव - पृ.क. २१० ते २१५

०३) तत्रैव - पृ.क. २१६ ते २२०

०४) तत्रैव - पृ.क. २२१ ते २२५

०५) तत्रैव - पृ.क. २२६ ते २३०

०६) तत्रैव - पृ.क. २३१ ते २३५

०७) तत्रैव - पृ.क. २३६ ते २४०

०८) तत्रैव - पृ.क. २४१ ते २४५

०९) तत्रैव - पृ.क. २४६ ते २५०

१०) तत्रैव - पृ.क. २५१ ते २५४

११) श्री नामदेव गाथा (१९७०)
महाराष्ट्र शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
संत महिमा पृ.क.३२१

१२) तत्रैव - पृ.क. २४